# सायबर सुरक्षेबाबत जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** ए.टी. झांबरे विद्यालयात इयत्ता आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी बुधवारी (दि. २२) सायबर सुरक्षा जनजागृती विषयावर विशेष मार्गदर्शन सत्र दुपारी १ ते २ या वेळेत घेण्यात आले होते. सत्रामध्ये प्रियदर्शनी भांडारकर व खुशबू लांबोळे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली. यावेळी ऑनलाइन, फसवणूक, स्मिशिंग, ओटीपी व पासवर्ड सुरक्षितता, मजबूत पासवर्ड तयार करण्याचे महत्त्व, दोन-स्तरीय प्रमाणीकरण, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, बनावट लिंक व क्यू-आर कोड स्कॅमपासून सावध राहणे तसेच सायबर बुलिंग, डिजिटल गोपनीयता, अज्ञात व्यक्तींशी ऑनलाइन संपर्क टाळणे तर याचबरोबर मोबाइल ॲप्स डाउनलोड करताना घ्यावयाची सुरक्षा काळजी आणि सायबर गुन्ह्यांपासून बचावाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.